तरुण भारत

Apla Nagpur | 2019-10-19 | Page- 2

# आंतरराष्ट्रीय विज्ञान उत्सव ५ नोव्हेंबरपासून

## महासंचालक डॉ. शेखर मांडे यांची माहिती



◆ नागपूर, १८ ऑक्टोबर

नागरिकांमध्ये विज्ञानाचा प्रचार व प्रसार व्हावा, या प्रमुख उद्देशाने 'समाजासाठी विज्ञान' या संकल्पनेवर आधारित आंतरराष्ट्रीय विज्ञान उत्सवाचे आयोजन येत्या ५ ते ७ नोव्हेंबरदरम्यान कोलकाता येथील विश्‍व बंगला कन्व्हेंशन सेंटरमध्ये करण्यात आल्याची माहिती सीएसआयआरचे महासंचालक डॉ. शेखर मांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी सीएसआयआर-नीरीचे संचालक डॉ. राकेश कुमार उपस्थित होते.

डॉ. शेखर मांडे यांनी सांगितले की, विज्ञान आणि तंत्रज्ञान हे समाजाशी निगडित आहेत. त्यामुळे विज्ञानाचे शोध हे समाजापर्यंत पोचविण्यासाठी या आंतरराष्ट्रीय विज्ञान उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाचे हे ५ वे वर्ष आहे. पहिला उत्सव दिल्लीमध्ये घेण्यात आला असून, गेल्यावर्षी लखनऊमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला होता. प्रत्येक उत्सवात आम्ही गिनीज् बुक रेकॉर्डमध्ये नाव नोंदवले आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमात विविध वैज्ञानिकांवर आधारित २८ ते ३० सत्रे घेतल्या जातील. युवकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता राष्ट्रीय युवा परिषदही घेण्यात येणार आहे. तसेच ७ नोव्हेंबरला भौतिकशास्त्रात नोबल पुरस्कारप्राप्त भारतरत्न वैज्ञानिक सी. पी. रामण यांच्या जयंती दिनी नवभारत निर्माण संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर करण्यात येईल. उत्सवाकरिता १२ हजार वैज्ञानिकांनी नोंदणी केली असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. राकेश कुमार म्हणाले, अशाप्रकारच्या उत्सवांमुळे युवा वैज्ञानिकांना संधी व त्यांनी सुरू केलेल्या उद्योगांना चालना मिळते.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd